**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.२९८२      दि. १४/०९/२०१९**

## उत्तमनगर पोलीस ठाणे पुणे शहर
## गर्दीत हरविलेल्या ०४ वर्षाच्या मुलाला त्यांचे नातेवाईकांचे ताब्यात दिले

दिनांक १२/०९/२०१९ रोजी उत्तमनगर पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात गणपती विर्सजन बंदोबस्त सुरु असताना दुपारी १२/३० वा चे सुमारास एक ०४ वर्षाचा मुलगा गर्दीत पालकापांसुन हरवलेला व रडत असताना मिळुन आला. साउन्ड सिस्टीम  सुरु असताना व सर्वजण नाचण्यात व तो नाच पाहण्यात दंग असताना त्या रडणा-या मुलाकडे कोणाचे लक्ष नव्हते. त्याच वेळी तेथें बंदोबस्तावर असणारे पोलीस शिपाई श्री संभाजी कोंढावळे यांनी त्या रडणा-या मुलास पाहीले व त्यास उचलुन घेवून गर्दीपासुन दुर घेवून जावून त्यास पिणेस पाणी व खाऊ देवून त्याचेकडे त्याचा नावपत्ता विचारला असता तो मुलगा घाबरल्यामुळे आपले नाव सांगु शकत नव्हता. पो कॉ कोंढावळे यांनी त्या मुलास कडेवर घेवून उत्तमनगर भागात फिरुन नागरीकांकडे फिरुन तो मुलगा कोणाचा आहे. याची विचारणा करुन माहिती घेत असताना त्यांना शोध करीता असताना महिला नामे सोना गणेश अडागळे  या मिळुन आल्या व तो रडत असलेला मुलगा हा जय गणेश अडगाळे हा असल्याचे समजले. नमुद मुलाचे कुंटुबही त्या मुलाचा मागील ०२ तासापासुन शोध घेत होते. मुलास पाहुन कुंटुबाचे सदस्य रडु लागले. त्या मुलास नातेवाईकांकडे सुपुर्द करणेत आले आहे. कुंटुबातील सदस्य यांनी पोलीसांचे आभार मानले आहेत. पो.शि. कोंडवळे यांनी वरील प्रमाणे केलेल्या  चांगल्या कामामुळे पोलींसाची जनमानसातील प्रतिमा उंचावलेली आहे. पो कॉ कोंढावळे हे भारतीय सैन्य दलात कामकाजाकरीता होते. ते सेवानिवृत्त होवून पोलीस खात्यात रुजु झाले असुन त्यांनी भारतीय सैन्य दलात ही उत्कृष्ठ कामगीरी केली आहे.


SHOT ON REDMI NOTE5 PRO
MI DUAL CAMERA